ISSN: 2230-7850 IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)

INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

VOLUME - 7 | ISSUE - 5 | JUNE - 2017

# सोलापूरचा शैक्षणिक विकास स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतरच्या काळात : एक अभ्यास



**Pro.Dr. Vandana Abhij Bhanap**
**Professor , DBF Dayanand College, Solapur.**

**सारांश :**

सोलापूरचा शैक्षणिक विकास स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतरच्या काळात अभ्यासात असताना असे दिसून येते की, प्रथम प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळा या दृष्टीने हा विकास सतत होत राहिला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सर्व प्रकारचे शिक्षण सातत्याने प्रगती पथावर राहिले. हे प्रकरण प्रमुख चार मुद्यामध्ये विभागले आहे. प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये, महाविद्यालये आणि सोलापूरमधील शैक्षणिक विकासात विविध संस्थाचे योगदान हे ते चार मुद्दे आहेत. प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा याबद्दल महानगरपालिका व महाराष्ट्र शासन यांची भुमिका, खाजगी शिक्षण संस्थानी शिक्षणाचा केलेला प्रसार, पारंपारिक महाविद्यालये यांचा ही परामर्श घेतला आहे. इंग्रजानी पाश्चीमात्य विचारसरणी आणि प्रभावी शस्त्रे याच्या जोरावर आपल्या देशात सत्ता स्थापन केली. व्यापारामधून राज्यसत्ता प्रभावीपणे राबविली. राज्यकारभार करताना त्याना भाषेची अडचण येऊ लागली. संस्कृत , फारसी आणि इंग्रजी यापैकी कोणती भाषा स्विकारावयाची याबद्दल प्रश्न निर्माण झाला. या संदर्भात कायदेमंत्री असलेल्या मेकॉले याने इंग्रजी भाषा असावी असा निर्णय घेतला. त्याप्रमाणे एकोणीसाव्या शतकाच्या पूर्वार्धात भारतात इंग्रजी भाषेच्या शाळा सुरु झाल्या. नोकऱ्या मिळतात म्हणून इंग्रजी शाळा वाढल्या. सरकारी शाळेबरोबर खाजगी शाळा सुरु झाल्या. हंटर कमिशनच्या निर्णयाप्रमाणे अल्पप्रमाणात का होईना खाजगी शाळाना अनुदान मिळू लागले.

**प्रस्तावना :**

स्वातंत्र्योत्तर काळात इ.स. १९६० पर्यंत जुन्या शिक्षण पध्दतीत फारसा बदल झालेला नाही. या संधीकाळातच ई.बो.सी.ची योजना आली. त्यामुळे त्यानंतरच्या काळात झपाट्याने शिक्षणाचा विस्तार होत गेला. शाळांची संख्यात्मक वाढ झाली. या वाढीला विद्यार्थ्यांच्या आर्थिक सवलती बरोबर शाळाना मिळणारे शंभर टक्के अनुदान हेही एक कारण आहे.

विद्यार्थ्यांच्या संख्यात्मक वाढीने सुशिक्षित बेकाराचा प्रश्न निर्माण झाला. यातून शिक्षणात परिवर्तन केले पाहिजे असा विचार पुढे आला. राधाकृष्णन शिक्षण आयोग., मुदलियार शिक्षणआयोग व कोठारी शिक्षण आयोग अशी आयोगे नेमली गेली. कोठारी आयोगाच्या शिफारसी सर्वकष, परिपूर्ण, व्यवहारवादी उपयुक्त व शिक्षणाला योग्य दिशा दणाऱ्या होत्या. महाराष्ट्र शासनाने कोठारी आयोगाच्या शिफारसी स्विकारल्या आणि त्यातून ११-४ ऐवजी १०+२+३ असा नवा आकृतीबंध स्विकारला व तोच अद्याप चालू आहे.

सोलापूरमध्ये प्राथमिक शिक्षणाचा पहिला संदर्भ इ.स. १८५३ या वर्षामध्ये सापडतो. या वर्षात फक्त मुलांची एक मराठी व एक इंग्रजी शाळा होती. या शाळेत फक्त इयत्ता चौथीपर्यंतचे शिक्षण मिळत होते. सोलापूर मध्ये मुंबई ईलाखा सरकार (दि गव्हमेंट ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी), सोलापूर नगरपालिका, ग्रेट इंडियन पेन्शूला रेल्वे यांनी शिक्षण प्रसाराचे कार्य केले. मिशनरीज यांनी शिक्षण प्रसाराचे कार्य केले. इ.स. १८५५ मध्ये सोलापूरमध्ये एका हायस्कूलची स्थापना झाली होती. ते इंग्रजी माध्यमाचे होते. इ.स. १८५७ मध्ये त्या हायस्कूलला **''सिटी हायस्कूल ''** असे नाव देण्यात आले. मुंबई प्रेसिडेन्सी सरकारचे गव्हर्नर नॉर्थकोट यांनी जूलै १९०२ मध्ये सोलापूरला भेट दिली. त्यावेळी हेडमास्तरच्या विनंतीनुसार सरकारी ठराव नंबर १९०० दि. २० ऑक्टोंबर १९०२ रोजी या हायस्कूलला '' **नॉर्थकोटहायस्कूल ''** असे नाव देण्यात आले. मुंबई सरकारने या हायस्कूलला रु. ४७,७५२/- रु. चे अनुदान बिल्डींगसाठी दि. १२ जून १८९६ च्या ठरावाने दिले होते. पुढे प्राथमिक शाळा, हायस्कूल्स, होस्टेल्स, इंडस्ट्रीयल स्कूल्स, कृषि महाविद्यालये, स्वतंत्र मुलींच्या शाळा इत्यादीची स्थापना झाली आणि शैक्षणिक विकास सतत होत राहिला.

सोलापूरातील प्राथमिक शिक्षणाच्या प्रगतीच्या इतिहासाकडे दृष्टिक्षेप टाकला तर सोलापूर नगरपालिकेने मुलींचे शिक्षण, औद्योगिक, शिक्षण व हिंदी, उर्दू, संस्कृत, कन्नड, तेलुगू, गुजराती, सिंधी व अरेबिक इत्यादी भाषांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरविल्याचे दिसून येते .

खालील तक्त्यामध्ये इ.स. १९२५ या वर्षातील विविध माध्यमांच्या शाळांची संख्या दाखविली आहे.

| अ.क्र. | शाळांची नांवे | शाळाची संख्या |
|---|---|---|
| १ | मराठी प्राथमिक शाळा | **११** |
| २ | उर्दू प्राथमिक शाळा | ०५ |
| ३ | मागासवर्गिय प्राथमिक शाळा | ०४ |
| ४ | संस्कृत रात्र शाळा | ०१ |
| ५ | अरेबिक रात्र शाळा | ०१ |
| ६ | गुजराती शाळा | ०१ |
| ७ | कन्नड शाळा | ०१ |
| | **एकूण** | **२४** |

**आधार** : सोलापूर महानगरपालिका, वार्षिक अहवाल,१९२५.

वरील तक्त्यामध्ये मराठी माध्यमाच्या शाळांची संख्या सर्वाधिक म्हणजे ११ आहे. तर सर्वात कमी संस्कृत, अरेबिक ,गुजराती व कन्नड शाळाची संख्या फक्त एक आहे.

सरकारने ठराविक वयोमर्यादेपर्यंतच्या मुलांना सक्तीचे प्राथमिक शिक्षण द्यावे असा कायदा करण्यापूर्वीच सोलापूर नगरपालिकेने स्वयंस्फूर्तीने व जनतेला अधिकाधिक शिक्षण देण्याच्या तळमळीमुळे आपल्या कार्यक्षेत्रात मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याच्या योजना आखून त्या कार्यवाहीत आणल्या होत्या. या प्रांतातील बहुतेक शहरांतून मोफत व सक्तीचे शिक्षण सुरु होण्यापूर्वी सोलापूर शहरांत या योजना सुरु करण्यात या नगरपालिकेने अग्रेसरत्व पटकाविले आहे. हरिजनांच्या शिक्षणाकडेही या नगरपालिकेने विशेष लक्ष पुरविले असून हरिजन वस्तीत मुलांच्या व मुलींच्या अनेक शाळा सुरु केल्या आहेत. सोलापूरसारख्या ठिकाणी धंदे, शिक्षणाची अत्यंत निकड भासत असल्यामुळे सोलापूर नगरपालिकेने इ.स. १८९९ साली **'कमर्शियल स्कूल '** म्हणजे व्यापारी शाळा सुरु केली. त्याचप्रमाणे शहरांत उद्योग शाळा स्थापन करण्याच्या कल्पनेचा पाठपुरावा इ.स. १९०२ सालापासून सुरु केला. प्रत्यक्षांत मात्र इ.स. १९३१ साली नगरपालिकेची **'उद्योग शाळा'** अस्तित्वांत आली. या शाळेत सुतारकाम, विणकाम, लोहारकाम, चित्रकला, इलेक्ट्रिकल, वायरमन इत्यादी विषयाचे शिक्षण देण्यात येत असे.

## प्राथमिक शिक्षण

मानवी जीवनात प्राथमिक शिक्षण हा शिक्षणाचा पाया आहे. भारताच्या प्राचीन संस्कृतीमध्ये १६ संस्कारापैकी वेदारंभ संस्कार करुन शिक्षणाचा पाया घातला जात असे. विद्यार्थ्याला गुरुच्या आश्रमात राहून शिक्षण घ्यावे लागत असे. कालांतराने त्याचेच रुपांतर आजच्या आधुनिक काळात शाळा व शिक्षक ह्यामध्ये झाले.

## सोलापूर महानगरपालिका प्राथमिक शिक्षण पार्श्वभूमी

इ.स.१९२१ मध्ये सर परांजपे हे मुंबई प्रांतातील शिक्षण मंत्री असताना मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम१९२३ हे पास केले व इ.स. १९२४ मध्ये प्रांतातील शिक्षण मंत्री असताना मुंबई प्रांतात नगरपालिका व महानगरपालिका पातळीवर स्वतंत्र स्कूलबोर्ड अस्तित्वात आले. दि.१-४-१९२४ रोजी सोलापूर प्राथमिक शिक्षण मंडळाची स्थापना झाली[1]. प्राथमिक शिक्षणाचे पहिले चेअरमन म्हणून डॉ. व्ही. व्ही. मुळे यांची निवड करण्यात आली. त्यावेळेपासून सोलापूर प्राथमिक शिक्षणाचा मंडळाचा कारभार सुरु झाला. शिक्षणाच्या नव्या दृष्टीनुसार अभ्यासक्रमांत विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाला साहाय्य करणाऱ्या समग्र अनुभव संहितेचा समावेश करण्यासाठी अभ्यासोत्तर समजल्या जाणाऱ्या क्रिडा, वक्तृत्व , नाट्य, शिक्षण इत्यादि चा अंतर्भाव करण्यात आला. यामुळे विद्यार्थ्यांचा सामाजिक व भावनात्मक विकास तसेच त्यांच्या सुप्त गुणांचा विकास होण्यास मदत झाली. यातूनच विद्यार्थ्यांची सहनशीलता प्रकट होते व त्यातून सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमाला सोलापूर महानगरपालिकेने जाणिवपूर्वक निश्चित असे स्थान मिळवून दिलेले आहे.

## प्राथमिक शिक्षणाअंतर्गत महानगरपालिका शिक्षण महामंडळ

शहाराच्या हद्दीत येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षण देणे व विनामूल्य देणे ही महानगरपालिकेचे आद्य कर्तव्य मानून

महानगरपालिकेने शिक्षण समिती नेमली. व त्यावर एक शिक्षणाधिकारी नेमला . यातील दोन सभासद राज्य शासनाकडून नेमले होते. या दोन सभासदापैकी एक सभासद सरकारी अधिकारी होता. इतर सभासदांची नेमणूकही महानगरपालिका करत होती. नेमण्यात येणारे सभासद हे महानगरपालिकेचे सभासद असतील अगर नसतील , परंतू त्यांचे एस.एस.सी पर्यंत शिक्षण झाले असले पाहिजे. तसेच त्यांना एखाद्या संस्थेत शिकविण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे, अशी अट होती.

## शिक्षण मंडळाचा अर्थसंकल्प

शिक्षण मंडळ शिक्षणप्रमुखांच्या सहाय्याने ठरविलेल्या नमुन्यात प्रत्येक वर्षी एक प्राथमिक अर्थसंकल्प तयार करते व तो आदल्या वर्षांच्या सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या दिनांकापूर्वी महानगरपालिकेकडे मान्यतेसाठी सादर करते. शिक्षण मंडळाने तयार केलेल्या अर्थसंकल्पात आवश्यक ते फरफार करण्याचा अधिकार महानगरपालिकेस आहे व तो महानगरपालिकेने दि. १ जानेवारी पूर्वी मान्य केला पाहीजे असे बंधन होते.

अशा रितीने मान्य केलेला प्राथमिक अर्थसंकल्प सुधारित अर्थसंकल्पास मान्यता मिळेपर्यंत कार्यवाहीत राहतो. या वर्षाच्या शासकीय अनुदानाची रक्कम महानगरपालिकेस कळविण्यात आल्यावर शिक्षण मंडळ प्राथमिक अर्थसंकल्पात आवश्यक ते फरफार करुन सुधारित अर्थसंकल्प अनुदानाची मान्यतेसाठी सादर करते.

**खालील तक्त्यात इ.स. १९५७ ते १९७३ या काळातील महानगरपालिकेने प्राथमिक शिक्षणावर केलेला खर्च दाखविला आहे.**

| अ.क्र. | वर्ष | खर्च रुपये |
|---|---|---|
| १ | १९५७-५८ | १३,१२,९१० |
| २ | १९५८-५९ | १४,५२,६१२ |
| ३ | १९५९-६० | १३,५४,५४५ |
| ४ | १९६०-६१ | १७,७२,२७० |
| ५ | १९६४-६५ | ११,६२,२८७ |
| ६ | १९६५-६६ | १२,३२,६६२ |
| ७ | १९६६-६७ | १३,७९,७११ |
| ८ | १९६७-६८ | १६,६८,९२६ |
| ९ | १९६८-६९ | १८,४०,००० |
| १० | १९७१-७२ | १८,७४,८७० |
| ११ | १९७२-७३ | ५३,००,००० |

**आधार:** वार्षिक अहवाल, १९७२-७३, पृ. ६२-३,

वरीलप्रमाणे महानगरपालिका शाळा व त्यावरील खर्चाचे वाढते प्रमाण ह्यावरुन समाजातील शिक्षणाचे महत्व वाढत गेलेले दिसते. या सोयीसुविधामुळे सर्व भाषेचे, विविध समाजाचे विशेषत: गरीब, होतकरु विद्यार्थी शाळेकडे आकर्षिले गेले. शाळांची व विद्यार्थ्यांची वाढती संख्या यावरुन हे लक्षात येते.

इ.स. १९६४ मध्ये नगरपालिकेचे महानगरपालिकेत रुपांतर झाले आणि काही वर्षातच शाळाची प्रगती झाल्याचे खालील तक्त्यावरुन दिसून येते.

**खालील तक्त्यात इ.स.१९६८ ते १९७३ या काळातील शाळांची तपशीलवार माहिती दिली आहे.**

| अ. क्र. | वर्ष | शाळांची संख्या | विद्यार्थ्यांची संख्या | | एकूण | शिक्षकांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मुले | मुली | | |
| १ | १९६८ | १८८ | ३३,१९५ | २२,६३३ | ५५,८२८ | १,४७३ |
| २ | १९७१ | १९८ | ३५,९५५ | २५,४१६ | ६१,३७१ | १,५९४ |
| ३ | १९७२ | २०१ | ३७,४६९ | २६,४०५ | ६३,७८४ | १,६७४ |
| ४ | १९७३ | २१० | ३८,२६५ | २८,७०६ | ६६,९७१ | १,७५० |

**आधार** : सोमनपा, वार्षिक अहवाल, १९७२-७३.

वरील तक्त्यात इ.स. १९६८ ते १९७३ या चार वर्षात शाळांची संख्या, विद्यार्थ्यांची संख्या व शिक्षकाची संख्या सातत्याने वाढत गेल्याचे स्पष्ट होते. त्यावरुन समाजातील पालकांना शिक्षणाचे महत्व पटलेले दिसून येते. प्राथमिक शिक्षण मंडळाच्या नियंत्रणाखाली इ.स.

१९२५ ला १९ शाळा होत्या. या शाळामधून एकूण ५,१०३ विद्यार्थी होते. त्यापैकी १,५७१ विद्यार्थीनी होत्या.

### विविध माध्यमाच्या शाळा

सोलापूरात राहणाऱ्या विविध भाषेच्या लोकांमुळे विविध माध्यमांच्या शाळा विकसित झाल्या. इ.स. १९२५ मध्ये विविध माध्यमांच्या शाळेतून संस्कृत, अरेबिक, रात्र शाळा, गुजराती शाळांचा समावेश होता. मात्र कालांतराने ही माध्यमे जरी संपली तरी इतर माध्यमांमध्ये विद्यार्थी संख्या वाढली होती.

### अ) प्राथमिक शाळा

सोलापूर शहरात नगरपालिका पुरस्कृत प्राथमिक शाळा आणि खाजगी प्राथमिक शाळा या स्वरुपातून प्राथमिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध आहे. सोलापूर शहरातील हद्दीत येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षण देणे व ते विनामूल्य देणे नगरपालिका अथवा महानगरपालिकेचे आद्य कर्तव्य असून ते आवश्यक सेवेत मोडते. यासाठी महानगरपालिका शिक्षण समिती नेमते व त्यावर एक शिक्षणाधिकारी नेमला जातो. तो शिक्षणासंबंधी सर्व जबाबदारी पार पाडतो. आपल मूल तीन वर्षांच झाल की प्रत्येक आईवडीलाची धावपळ सुरु होते. त्या मुलाला चांगल्या आणि नावाजलेल्या शाळेत घालण्यासाठी सोलापूरमध्ये पालकाची आधी धावपळ होत होती. सोलापूरमध्ये रोजगाराच्या शोधात बाहेरील राज्यातून लोक आले. लोकाना कापड गिरण्यामुळे रोजगार मिळाला. त्यांच्या पाल्याना शिक्षण घेताना माध्यमांची व भाषेची अडचण आल्याने भाषानुसार प्राथमिक शाळा सुरु झाल्या. प्राथमिक शिक्षणाचा व शाळांचा अभ्यास करताना महानगरपालिकेच्या नियंत्रणाखालील शाळा , खाजगी शाळा, मुलींच्या शाळा, बालकमंदिर व शिशुशाळा अशा सहा शाळांचा थोडक्यात अभ्यास केला आहे.

### १) नारायणराव कुचन प्राथमिक शाळा इ.स. १९५९

पद्मशाली शिक्षण संस्थेने इ.स. १९४२ साली कुचन प्रशालेची सुरुवात केली. पूर्व भागातील पालकांना एका दर्जेदार प्राथमिक शाळेची आवश्यकता भासली. कुचन प्रशालेलाही इ. ५ वी च्या प्रवेशासाठी ४ थी पर्यंत चांगल्या शाळेत शिकलेल्या विद्यार्थ्यांची निकड(feeding) भासू लागली. या दोन्ही गोष्टी लक्षांत घेऊन पद्मशाली शिक्षण संस्थेने स्वत:ची अशी एक प्राथमिक शाळा सुरु केली. याही वेळी कुचन घराण्याने आपले दातृत्व दाखविले. कै. सिद्रामप्पा कुचन यांनी आपले दिवंगत पुतणे कै. श्री . नारायणराव कुचन यांच्या स्मृत्यर्थ रुपये अकरा हजारांची देणगी दिली. शाळेच्या प्रारंभी ३८० विद्यार्थी होते.

### २) नूतन मराठी विद्यालय

लोकांना आवश्यक असे शिक्षण कमी फो मध्ये देणे, खाजगी शाळा सुरु करणे, मराठी साहित्य वृध्दीस प्रोत्साहन देणे, मराठी भाषेचा पाया सुदृढ करणे, मराठी भाषेला प्रोत्साहन देणे, स्वधर्म, स्वभाषा, स्वदेश यांच्या अभिमानाचे एक तेजस्वी शिक्षण देणे या हेतूने कै.रा.रा. विष्णू शास्त्री चिपळूणकर यांच्या स्मरणार्थ शिक्षणाचा प्रसार हेच ध्येय डोळ्यासमोर ठेवून श्री के. पं.मंगळवेढेकर यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ८-६-१९५९ रोजी सोलापूर येथे नूतन मराठी विद्यालयाची स्थापन झाली.

### ३) रामदास नरसय्या इप्पाकायल प्राथमिक शाळा,१९८७ आणि भूदेवीबाई रामदास इप्पाकायल बालक मंदिर, १९८७

*शहराच्या वाढत्या विस्ताराची गरज लक्षात घेऊन शहराच्या विविध भागात पूर्व प्राथमिक शाळा व प्राथमिक शाळा सुरु करण्याचा* पद्मशाली शिक्षण संस्थेने संकल्प सोडला. अशोक चौक व घोंगडे वस्ती या दोन ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला. दि.१२-८-१९८७ रोजी शासनाकडून अनुमति मिळाली. अशोक चौक व घोंगडे वस्ती या दोन्ही भागातील शाळांचे उद्घाटन दि. ६-१०-१९८७ रोजी लोकसभा सदस्य व संस्थेचे विश्वस्त गंगाधरपंत कुचन यांच्या हस्ते करण्यात आले.

### ४) राजमल नारायण बोमडयाल प्राथमिक शाळा, १९८७ व भारतीबाई राजमल बोमड्याल बालक मंदिर, १९८७

अशोक चौक भागातील या शाळांचे उद्घाटन दि. १२-८-१९८७ रोजी लोकसभा सदस्य व संस्थेचे विश्वस्त गंगाधरपंत कुचन यांच्या हस्ते करण्यात आले.

### शाळा संकुल

प्रारंभी अशोक चौक (भावनाऋषी पेठ ) येथील श्री गड्डम, श्री नारायणदास मोंडय्या सादूल यांच्या वाड्यात जागा भाड्याने घेऊन बोमड्याल प्राथमिक शाळा व बोमड्याल बालक मंदिरचे वर्ग सुरु करण्यात आले. काही दिवसानंतर त्याच परिसरातील कृष्णवेणी हातमाग विणकर सोसायटीचा हॉल प्रतिमास रु. ५००/- प्रमाणे भाडयाने घेण्यात आला. तेथे हे वर्ग भरविण्यास सुरुवात केली. नंतर अंबादास नारायण आरगोंडा यांच्या वाड्यातील ८५ × २७ फुट आकाराचे दोन हॉल व दोन वर्गखोल्या वार्षिक भाडे रु. २,५००/- प्रमाणे घेण्यात येऊन तेथे वर्गाचे स्थलांतर करण्यात आले. दुबार पध्दतीने शाळा सुरु करण्यात आली. सकाळच्या विभागात पूर्व प्राथमिक शाळा व दुपारच्या विभागात प्राथमिक शाळेचे वर्ग भरत असत.

### ५) रामव्वाबाई रामय्या बुर्ला प्राथमिक शाळा व बालक मंदिर , १९९४

श्री रामचंद्र बुर्ला हे निस्सीम मातृभक्त होते. आपल्या दिवाणखान्यातील दर्शनी भिंतीवर मातोश्री रामव्वाबाई यांची तसवीर त्यांनी भक्तिभावाने लावली होती. आपल्या हयातीनंतर ते तैलचित्र तेथून हलवू नये अशी (इच्छापत्रानुसार) त्यांची तळमळीची इच्छा होती. मातोश्रीचा कृपाशिर्वाद व स्मृती कायम रहावी, मातृऋणातून उतराई व्हावी म्हणून त्यांनी याच वास्तूत आईच्या नावाने शाळा सुरु करावी अशी इच्छा व्यक्त केली. आपली घर जागा घर क्र. १७२१/३४, या दोन इमारती पद्मशाली शिक्षण संस्थेस बक्षीसपत्राने देणगीदाखल दिल्या.

### ब) हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालये

या मुद्याचा अभ्यास करताना ऐतिहासिक कालानुक्रमे हायस्कूल, कन्या प्रशाला, इंग्लिश मेडीयम हायस्कूल, रात्र प्रशाला, तांत्रिक शिक्षण प्रशाला, विडी घरकूल प्रशाला अशा एकूण एकवीस महत्वाच्या हायस्कूल्स व त्यास जोडून कनिष्ठ महाविद्यालय यांचा विचार केलेला आहे. कांही हायस्कूल्स महानगरपालिका चालविते, कांही हायस्कूल्स व कनिष्ठ विद्यालय स्थानिक खाजगी संस्था चालवितात तर कांही हायस्कूल्स बाहेरील संस्था चालवितात. या सर्वांचे परीक्षा निकाल, उपक्रम, क्रिडा विभागातील सहभाग, इतर कार्यक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम, संस्थेचे अध्यक्ष इतर संचालक, मुख्याध्यापक, माजी विद्यार्थी वगैरे मुद्यांचा अभ्यास केलेला आहे.

### १) हरिभाई देवकरण प्रशाला, १९१८

सोलापूरमध्ये होम मैदानासमोर एक शालेय वास्तू गेल्या ९४ वर्षापासून दिमाखात उभी आहे. या वास्तुने या ९४ वर्षात सोलापूरातील अनेक मुलांना शिक्षणाचे पंख लावून दिले आहेत. या शाळेच्या काही विद्यार्थ्यांनी या पंखाची भरारी घेऊन राज्य व राष्ट्रीय पातळीवर आपले नाव कोरुन ठेवले आहे. अशा कर्तबगारांना घडवणारी ही शाळा म्हणजे हरिभाई देवकरण प्रशाला. हरिभाई देवकरण पेढीचे संचालक कै. हिराकाका यांनी त्याकाळी शाळेला २७००० रु. ची देणगी दिली आणि शाळेला हरिभाई देवकरण असे नाव मिळाले. शि.प्र. मंडळी पुणे या विष्णुशास्त्री चिपळूणकर आणि इतर पुण्यातील सुधारक व्यक्तिमत्वानी सुरु केलेल्या शिक्षणसंस्थेची सोलापूरातील हि पहिली शाळा .

### २) सखुबाई हिराचंद नेमचंद प्रशाला

श्री लक्ष्मणराव देशमुख यांच्या पत्नी लक्ष्मीबाई देशमुख यांच्या हस्ते संस्थेची स्थापना झाली. दि. ५-१०-१८९५ रोजी शाळा स्थापनेचा समारंभ श्री शंकरराव देगावकर यांच्या वाड्यात साजरा झाला. त्यावेळी लक्ष्मीबाई देशमुख यांनी भाषण करुन संस्थेच्या कार्याविषयी माहिती दिली. संस्थेचे नाव श्री सरस्वती मंदिर असे ठेवण्यात आले. सखुबाई हिराचंद नेमचंद प्रशालेला शाळेच्या सुरुवातीच्या प्रदीर्घ कालखंडात द.मो. दामले यांच्यासारखे मुख्याध्यापक लाभले हे या प्रशालेचे भाग्य. यानंतर यशाचे गौरीशंकर गाठण्यासाठी मुख्याध्यापक पदाची धुदा धारुरकर, नामजोशी, वाळवेकर, मोघे, हुल्याळकर, श्रीमती कट्टी, ढेरे यांनी यशस्वीपणे सांभाळली.

### ३) सेवा सदन प्रशाला, १९२३

दि. २-१०-१९०९ रोजी न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या पत्नी श्रीमती रमाबाई रानडे यांनी पुण्यात या संस्थेची स्थापना केली. अनाथ, असहाय्य, गांजलेल्या, परित्यक्ता, विधवा अशा अनेक प्रकारे पिडलेल्या स्त्रियांना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देऊन त्यांच्या जीवनात सुख शांतीचा ओलावा निर्माण करणे, त्यांना स्वावलंबी बनविणे, कर्मठ कालबाह्य रुढी परंपरा, अस्पृश्यता, अंधश्रध्दा याच्या शृंखलांनी ज्यांचे जीवन मृत:प्राय झालेले आहे अशांना या सर्व पाशांतून मुक्त करुन त्यांचे जीवन विकसित करण्यासाठी झटणे हे सेवासदनचे ध्येय आहे.

### ४) मॉडर्न हायस्कूल ,१९४२

सर्वोदय शिक्षण संस्थेचे हे हायस्कूल आहे. ही संस्था श्री के. एन. कुलकर्णी यांनी स्वत:च्या जबाबदारीवर स्थापना केली. हे हायस्कूल स्वत:च्या मालकीचे त्यांनी स्थापन केले. इ. स. १९४२ पासून या हायस्कूलला अनुदान मिळाले. कालांतराने इ.स. १९५४-५५ पासून इयत्ता ११ वी (एस.एस.सी) पर्यंत शिक्षणाची सोय केली.

### ५) कुचन प्रशाला

एखाद्या प्रेरणेला जेव्हा उदारतेचे पाठबळ प्राप्त होते तेव्हा ती प्रेरणा ध्येयापर्यंत पोहोचते. यशस्वी होते आणि निश्चितपणे ती गोष्ट आदर्शवादी ठरते. अशीच आदर्श ठरलेली सोलापूरच्या पूर्व भागातील एक वास्तु. ज्या वास्तुने समाजाला विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती दिल्या, त्यांना घडविले, बनविले, त्याला 'वास्तू ' नव्हे तर मायेच, संस्काराचं मंदिरच म्हणावे लागेल अशी शाळा म्हणजे कुचन प्रशाला. कै. तुकाराम रामय्या कन्ना यांच्या प्रेरणेला कै. सिद्रामप्पा कुचन व कै. नारायणराव कुचन यांच्या उदार देणगीने पाठबळ मिळाले आणि दि. ३-११-१९४३ रोजी कुचन प्रशालेची स्थापना झाली

### ६) सिध्देश्वर प्रशाला, १९४९

करंजकर विद्यालय या नावाने एक शैक्षणिक संस्था श्री सिध्देश्वर स्वामी यांनी २० व्या शतकाच्या पूर्वार्धात सुरु केली. तुळजापूर वेस येथे श्री नगरेश्वर मंदिरामध्ये ही प्रशाला भरत असे. कालांतराने श्री सिध्देश्वर देवस्थान पंच कमिटीने ही शाळा चालविण्याचे ठरविले. श्री सिध्देश्वर देवस्थान पंच मंडळीने श्री सिध्देश्वर शिक्षण प्रसारक मंडळ नावाची संस्था जून १९४६ मध्ये स्थापन करुन ही शाळा चालविण्यास घेतली. पहिले मुख्याध्यापक श्री गोवित्रीकर यांनी काम पाहिले. नंतर एस.एल. द्रविड , एस.एन.भुयार, डॉ. कृ.शि. मार्डीकर, व्ही.बी. देशपांड यांनी मुख्याध्यापक म्हणून काम पाहिले.

### ७) बी.एफ दमाणी प्रशाला, अमृतमहोत्सवी वाटचाल, १९५२

ज्ञानरुपी सागरात विज्ञानरुपी होड्या जीवनाचा पैलतीर यशस्वीपणे गाठण्यासाठी पालकांनी शाळेच्या स्वाधीन केल्या. याचे भान निश्चितच दमाणी विद्यामंदिराने ठेवले आहे. सोलापूर शहरातोल प्रथितयश लौकिकप्राप्त अशी एक शिक्षणसंस्था म्हणजेच दमाणी विद्यामंदिर. विद्याप्रचाराच्या ध्येयाने अमृत महोत्सवाकडे यशस्वीपणे वाटचाल करत आहे.

### संदर्भ


१) सिध्देश्वर प्रशाला, सुवर्ण महोत्सव, स्मरणिका, १९४६-९६, सोलापूर.पृ.क्र.दिला नाही.

२) एस.जी. साठे (संपा.), तंत्रविद्या मॅगेजीन, सोलापूर, १९६४, पृ.३.

३) बी.ए. इडी,व्हालूम ७८,(१८९६), गव्हमेंट रिझोलेशन नं. ११३, सी. डब्ल्यू.८४१, १८९६, पृ. १५७.

४) जी.पी. कुलकर्णी, सोलापूर महानगरपालिका शतसंवत्सरीक ग्रंथ, सोलापूर १९५३,पृ.२१०.

५) सोलापूर महानगरपालिका, महापौर सुवर्ण चषक, स्मरणिका, १९९१. पृ. क्र. दिला नाही.

६) आर.के. घाटे, कुलकर्णी, मेंगाळे, सोलापूर महानगरपालिका सिंहावलोकन, १९६४, पृ.५.तत्रैव, पृ.६.

७) महापौर सुवर्ण चषक, तत्रैव.

८) दिशा, सोलापूर महानगरपालिका माहिती पुस्तक, २००२, पृ.१२.तत्रैव, पृ.१३.

९) सोलापूर महानगरपालिका वार्षिक अहवाल, १९५२-५३, ६४-६५, १९६९-७०.

१०) महापौर सुवर्णचषक, तत्रैव.